Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२४ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.१ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# महाकाव्य रामायणातील प्रसंगांच्या सादरीकरणाची मुंबईकर रसिकांवर मोहिनी

## रामायणातील एकेक पात्रातून जीवन प्रणालीची ओळख – मंत्री सुधीर मुनगंटीवार






**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई भव्य सेट, आकर्षक देखावे, विद्युत रोषणाई व डोळ्याचे पारणे फेडणारे महाकाव्य रामायणातील प्रसंग यांनी अक्षरशः उपस्थितांना मोहिनी घातली. गीत, नाट्य, नृत्य आणि वादनाच्या माध्यमातून रामायणातील एकेका प्रसंगाचे सादरीकरण होत गेले आणि रसिक या रामायण भक्तीत हरवून गेले. दरम्यान, रामायण हे नवीन पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देते. रामायणातील एकेक पात्र जीवन प्रणाली सांगणारे आहे, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महाकाव्य रामायण या कार्यक्रमाचे आयोजन गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर, ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, रामायण मालिकेतील श्रीरामांच्या भूमिकेने प्रसिद्ध अभिनेते अरुण गोविल, आनंद माडगूळकर, अभिनेत्री रवीना टंडन, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती. महाकाव्य रामायण या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांनी पुन्हा एकदा ग.दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून आणि स्व. सुधीर फडके (बाबूजी) यांच्या आवाजातून अजरामर झालेल्या गीतरामायणातील विविध प्रसंगांतील गीतांचे सादरीकरण प्रत्यक्ष अनुभवले. स्वयें श्रीराम प्रभू ऐकती, दशरथा घे हे पायसदान, राम जन्मला ग सखे, चला राघवा चला, स्वयंवर झाले सीतेचे..अशा एकेका अजरामर गीतांचे सादरीकरण यावेळी झाले त्याला रसिकांनी मनापासून दाद दिली.यावेळी बोलताना मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, ४९६ वर्षांच्या संघर्षानंतर २२ जानेवारी रोजी श्रीरामाची अयोध्या येथे पुनर्प्रतिष्ठापना झाली. त्यासाठी महाराष्ट्राचे योगदान लाभले, ही भाग्याची गोष्ट. मंदिरातील महाद्वारासाठी लागणारे लाकूड (काष्ठ) हे चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. रामायणातील जटायू हे महत्वाचे पात्र आहे. त्या जटायू संवर्धनासाठी आपण नाशिक, ताडोबा आणि पेंच येथे तीन जटायू संवर्धन केंद्रे सुरू केली आहेत. रामायणातील एकेक पात्र जीवन प्रणाली सांगणारे आहे. संकटातून सावरण्याचे बळ प्रभू श्रीराम देतात, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.दिनांक २१ ते २५ फेब्रुवारी रोजी खारघर येथे अश्वमेध यज्ञ आयोजित केला असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर म्हणाले की, नवीन पिढीपर्यंत आपली संस्कृती पोहोचवण्याचे काम अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे, ही अतिशय चांगली बाब आहे. आनंद माडगूळकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. गीतरामायणाच्या आठवणी खूप आहेत. दिवसेंदिवस गीतरामायणाची लोकप्रियता वाढत आहे ही चांगली गोष्ट आहे. रामायणाची तत्व आपल्या सर्वांच्या जीवनात भिनली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाचे प्रधान सचिव खारगे यांनी केले. सांगीतिक असा कलाविष्कार गीत रामायणाच्या माध्यमातून पाहायला मिळते. हा कार्यक्रम म्हणजे भारतीय संस्कृतीचे प्रकटीकरण आहे, असे ते म्हणाले.यावेळी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती देऊन उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.प्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक चवरे यांनी मानले. या महाकाव्य रामायण सांस्कृतिक कार्यक्रमात श्रीरामांच्या भूमिकेत अभिनेता ललित प्रभाकर, सीतामाईच्या भूमिकेत अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि लक्ष्मणाच्या भूमिकेत शुभंकर परांजपे या कलाकारांनी सादरीकरण केले. तीनशेहून अधिक कलाकारांनी उत्तमोत्तम सादरीकरण करून रसिकांना खिळवून ठेवले.



# पुलगावहून सायकलस्वार निघाले शिर्डीला



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील साईभक्त दरवर्षी शिर्डीला सायकलने जातात. यावर्षी चोथे वर्ष आहे. आज दि.३१ ला दुपारी १ वाजता भार्गव जीन मधील श्री. साईबाबा मंदिरात पुजन करून सायकल वारीला प्रारंभ झाला.

या सायकल वारी करणाऱ्या भक्तांबरोबर चारचाकी वाहनात श्री साईनाथाची पालखी, त्यात मुर्ती व पादुका ठेवण्यात आल्या.हरिराम नगर येथे पुरातन साई मंदिरात पोहोचताच श्री. साईंचे पुजन करण्यात आले. यावेळी श्री. साई सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी पालखीचे पुजन करून सायकल स्वारांना शुभेच्छा दिल्या. सायकलने जाणाऱ्या साईभक्तांमध्ये मुरलीधर डाबरे, हरिभाऊ राऊत, बापुराव धांदे, विजय गुप्ता, स्वप्निल देवरे, नंदुभाऊ काळे, शुभम मारवे, किसनाजी वानखेडे, आनंद बाळसराफ, विजय कोकर्डे, हेमंत मस्कर, कु. स्वरूपा डाबरे, सुषमा मडावी, मयुरी मस्कर, तन्वी मस्के, सागर निकम, सागर सिरस्कार, गणेश चौरे, स्वप्निल काळे, अशोकराव आठबैले, प्रकाश राऊत, अण्णा पाटील धांदे, सोनल आदमने यांचा समावेश आहे.

# भद्रावती येथील रोजगार मेळाव्यात १९६ उमेदवारांची निवड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भद्रावती येथे २९ जानेवारी रोजी आयोजित पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात १९६ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडल करिअर सेंटर व श्री साई आय.टी.आय. भ्रदावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या रोजगार मेळाव्यात जय महाराष्ट्र प्लेसमेंट सर्व्हिसेस चंद्रपूर, व्हि-१ क्लिक सोलुशन, स्वातंत्र्य फायनान्स बल्लारपूर, एस.बी.आय. लाइफ इन्शुरन्स, नवभारत फर्टिलायझर नागपूर, भारत पेट्रोलियम, नवकिसान बायोटेक नागपूर, संसूर सृष्टी, स्टार युनियन लाइफ इन्शुरन्स, श्रीराम लाईफ आदी कंपन्या सहभागी होत्या. या रोजगार मेळाव्यात ८५०उमेदवार सहभागी झाले होते, त्यापैकी १९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

रोजगार मेळाव्याला जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य भालचंद्र रासेकर, साई इंजिनिअरीग कॉलेजचे प्राचार्य डॉ. विनोद गोरंटीवार तसेच सर्वश्री अमित गुंडावार, रविंद्र शिंदे, अमित पत्तीवार, करूणा पत्तीवार, राजेश नगराळे, आदींची उपस्थिती होती.

# शारदा नागापुरे गोल्डन क्लब अवार्ड ने सन्मानित



**वरोरा । प्रतिनिधी**

येथील शारदा प्रमोद नागापुरे यांना २०२२-२०२३ या आर्थिक वर्षांत विमा प्रतिनिधी म्हणून उल्लेखनीय कामगिरी बद्दल वरोरा येथील भारतीय जीवन विमा निगम वरोरा शाखेच्या वतीने उत्कृष्ट विमा अभिकर्ता म्हणून सन्मानित करण्यात आले.

शारदा प्रमोद नागापुरे या मागील अनेक वर्षांपासून भारतीय जिवन विमा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात शारदा प्रमोद नागापुरे यांनी ७१ पॉलिसी व १० लाख नॉन सिंगल प्रीमियम करून गोल्डन क्लब अवॉर्ड देऊन शाखा प्रबंधक मोहन गोगुलवार , सेल्स मॅनेजर सुनील बिझवे, विकास अधिकारी सचिन उघडे यांनी गोल्डन क्लब अवॉर्ड ट्रॉफी, प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू देऊन सहपरीवार सन्मानित केले. हा कार्यक्रम १३ जानेवारी २०२४ ला वरोरा येथील आशीर्वाद मंगल कार्यालय, वरोरा येथे पार पडला, यावेळी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक विमा प्रतिनिधी यांना सन्मानित करण्यात आले.

# सरकारच्या अधिसूचने मुळे ओबीसी समाजावर अन्याय होणार नाहीच : डॉ.अशोक जीवतोडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य सरकारने दि. २५ व २६ जानेवारीला मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा- कुणबी, व कुणबी -मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंबंधात नोंदी तपासून कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत अधिसूचना काढली आहे. या अधिसुचनेवर १६ फेब्रुवारी पर्यंत हरकती मागविल्या आहेत.

ओबीसी समाजात या अधिसूचनेमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र सदर अधिसूचना व सद्यपरिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.राज्य सरकारने दिनांक २५ व २६ जानेवारीला प्रसिध्द केलेल्या कागदपत्रानुसार अधिकृतपने राज्यात आतापर्यंत २० जानेवारी २०२४ अखेर पर्यंत ५७ लाख ४१ हजार २४१ कुणबी नोंदी सापडल्या. त्यापैकी संपूर्ण राज्यात ३८ लाख ९७ हजार ३९१ कुणबी लोकांना प्रमाणपत्र वितरित केल्या गेले. म्हणजे एका घरचे पाच-पाच पकडून २ कोटी लोकांना प्रमाणपत्र दिल्या जाईल असा विषय मांडल्या जात आहे. मात्र ह्या सर्व कुणबी नोंदी जुन्याच असून नव्या नोंदी खूप अल्प आहेत.पूर्व विदर्भात म्हणजे नागपूर विभागात ९,४२,२०८ कुणबी नोंदी सापडल्या त्यापैकी ८,७४,८३७ कुणबी प्रमाणपत्र वितरीत केले. तर अमरावती विभागात २६,१५,२२७ कुणबी नोंदी सापडल्या त्यापैकी १०,६६,३३१ कुणबी प्रमाणपत्र वितरीत केले. ज्या ठिकाणी मराठ्यांचे कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आंदोलन सुरू आहे, त्या छत्रपती संभाजी नगर विभागात कुणबी प्रमाणपत्रची नोंद असलेले ३२,०९१ आहे त्यापैकी २३,२९० कुणबी प्रमाणपत्र वितरीत केले गेले आहे. या विभागामध्ये सन १९८६ ते २३ ऑक्टोबर २०२३ पर्यंत २३६३ कुणबी नोंदी होत्या व २४ ऑक्टोबर २०२३ नंतर म्हणजे शिंदे समिती स्थापनेनंतर आजपर्यंत मराठवाड्यात २०,९२७ नवीन नोंदी सापडल्या अशा एकूण २३,२९० एव्हढी कुणबी जात प्रमाणपत्र वितरीत केली. व हे प्रमाण देखील कमीच आहे, निजामशाहीतील रेकॉर्ड आज उपलब्ध नाही, अथवा रेकॉर्ड नष्ट झाल्यामुळे तेथील कुणब्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळत नाही त्यामुळेच मनोज जारांगे यांनी आंदोलन सुरू केले होते, व हीच



मराठा आरक्षण आंदोलन सुरू होण्याची खरी गोम आहे. पुणे विभागात ६,०७,६१९ पैकी ७७,७३३ वितरीत ,कोंकण विभागात ७,५३,०५६ कुणबी नोंदीपैकी ६,७९,०४८ प्रमाणपत्र वितरीत केले गेले.नागपूर विभागात ९,४२,२०८ कुणबी नोंदी आहे. ८,७४,८३७ कुणबी प्रमाणपत्र वितरीत केले. ही सध्यस्थिती २० जानेवारी २०२४ अखेर पर्यंतची आहे. कुणबी नोंदी ज्या मराठा व्यक्तीच्या आढळतील त्यांना पितृसत्ताक कुटुंब पद्धतीप्रमाणे सगेसोयरे यांची जूनिच व्याख्या नव्याने मांडून कुणबी प्रमाणपत्र देण्याचे या अधिसूचनेत नमूद आहे,नवीन अधिसूचनेचा विचार करता आधीचे नियम बघावेच लागेल, वडील आजोबा किंवा पणजोबा,खपरपांजोबा यांच्या महसूली/शैक्षणिक कागदावर जर कुणबी जातीची नोंद नियमानुसार असेल तर त्या व्यक्तीच्या कुटुंबातील वडीलाकडील नातेवाईकांना नियमानुसारच कुणबी प्रमाण पत्र मिळते.सगे सोयरे शब्द नव्याने समावेश करून जुने शब्द तसेच ठेवले आहे. जातीमधील झालेल्या सजातीय लग्न संबंधातून निर्माण झालेले रक्त संबंधातील नातेवाईक अशानाच कुणबी प्रमाणपत्र मिळेल.नोंद मिळालेल्या नागरीकांच्या रक्त नात्यातील किंवा पितृसत्ताक नात्यातील लोकांना प्रमाणपत्र मिळेल.हे सर्व जुनेच नियम आहेत.केवळ आणि केवळ शब्दांचा खेळ करून संभ्रम निर्माण केला गेला आहे.या अधिसूचनेत नवीन असे काहीच नाही, सध्याच्या प्रचलित पितृसत्ताक पध्द्तीनेच कुणबी प्रमाणपत्र मिळेल.

**आईकडील जातप्रमाणपत्राचा संबंध म्हणजे मातृसत्ताक पध्दतीचा उल्लेखच या मसुद्यात नाहीच.**

आता पर्यंत जो आकडा सांगितला तो चुकीचा नसून त्यापैकी अनेकांकडे आधीचेच कुणबी प्रमाण पत्र आहे. हे नवीन कुणबी लोक नाही. जुनेच लोक आहेत.त्यांच्या नोंदीदेखील जुन्याच आहेत.शिंदे समिती (२४ ऑक्टोबर २०२३) स्थापने नंतर फक्त २० हजार प्रमाणपत्र मराठवाड्यात प्रदान केले गेले. व ते देखील तपासूनच दिल्या गेले आहे,त्या दिलेल्या प्रमाणपत्रावर अजूनही कोणती तक्रार नाहीच व अजून एकाचीही जात वैधता झालेली नाही. ती करतांना देखील समाजकल्याण अधिकारी सर्व निकष, नियम बघूनच करतील. निकषाप्रमाणे जात वैधता पुनश्च तपासल्या जाते. नोंदी निकषानुसार असेल तरच त्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येते.५७ लाखांहून अधिक नोंदी सापडल्या ज्या की जुन्याच कुणबी लोकांच्या आहेत, तडकाफडकी त्या नव्याने टाकलेल्या नाहीत, त्या आजच्या नाहीत. त्यामुळे ओबीसी लोकांवर अन्याय होत नाहीच.तरीदेखील या अधिसुचनेवर/मसुद्यावर १६ फेब्रुवारी पर्यंत हरकती मागविल्या आहेत, त्यानुसार ज्यांना हरकती घ्यायच्या आहेत, त्यांनी अभ्यास करूनच हरकती नक्की घ्याव्यात, असे आवाहन डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले आहे.

# गस्त आणि देखरेख क्रियाकलापांचा समावेश

भारतीय तटरक्षक दलाच्या स्थापनेचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी तो साजरा केला जातो. भारताच्या विशाल सागरी हितांचे रक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाच्या समर्पित सेवा आणि अमूल्य योगदानाची दखल घेत या दिवसाला खूप महत्त्व आहे. भारतीय तटरक्षक दल, एक निमलष्करी दल, देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यात, सागरी सुरक्षा सुनिश्चित करण्यात आणि विविध सागरी आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय तटरक्षक दल-आईसीजीची स्थापना झाली. भारतीय तटरक्षक दलाची स्थापना ही सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आणि भारताच्या विशाल किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. हा दिवस महत्त्वाचा आहे, कारण तो केवळ एक शक्तिशाली सागरी दलाच्या जन्माचे स्मरण करत नाही तर देशाच्या सागरी हितसंबंधांची सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाने केलेल्या अमूल्य योगदानाची ओळख देखील करतो. आपण भारतीय तटरक्षक दलाचा इतिहास, त्याची भूमिका आणि जबाबदाऱ्या, त्यांची उपलब्धी आणि त्यांचे ध्येय पूर्ण करताना येणाऱ्या आव्हानांचा सखोल अभ्यास करू.

भूमिका आणि जबाबदाऱ्या:

सागरी सुरक्षा- भारतीय तटरक्षक दलाला भारताच्या सागरी सीमांची सुरक्षा सुनिश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यामध्ये विशेषत: संवेदनशील भागात अनधिकृत प्रवेश आणि जहाजांचे निर्गमन रोखण्यासाठी गस्त आणि देखरेख क्रियाकलापांचा समावेश आहे. शोध आणि बचाव- तटरक्षक दलाच्या महत्त्वपूर्ण कार्यांपैकी एक म्हणजे समुद्रात जीव वाचवण्यासाठी शोध आणि बचाव कार्य करणे. ते संकट कॉलला प्रतिसाद देतात, बचाव प्रयत्नांचे समन्वय साधतात आणि संकटात असलेल्या नाविकांची सुरक्षा सुनिश्चित करतात. सागरी कायद्याची अंमलबजावणी- तटरक्षक दल समुद्रात कायद्याची अंमलबजावणी करणारी एजन्सी म्हणून काम करते, सागरी कायदे आणि नियमांची अंमलबजावणी करते. ते सागरी क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तस्करी, चाचेगिरी आणि बेकायदेशीर मासेमारी यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांचा मुकाबला करतात. पर्यावरण संरक्षण- सागरी पर्यावरणाचे संरक्षण हे तटरक्षक दलाच्या जबाबदाऱ्यांचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ते तेल गळतीला प्रतिसाद देतात, प्रदूषण प्रतिसाद कार्ये चालवतात आणि सागरी परिसंस्थेच्या संरक्षणात योगदान देतात. मानवतावादी सहाय्य- चक्रीवादळ, पूर किंवा त्सुनामी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी, कोस्ट गार्ड मानवतावादी मदत प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ते बाधित भागातून लोकांना बाहेर काढतात, मदत पुरवठा करतात आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयत्नांना हातभार लावतात.

भारतीय तटरक्षक दिनाचे महत्त्व:

भारतीय तटरक्षक दिन हा या सागरी दलात सेवा करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या अदम्य भावनेची आणि वचनबद्धतेची कबुली देणारा प्रतिबिंब आणि उत्सवाचा दिवस आहे. देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे त्याग, समर्पण आणि अटूट संकल्प ओळखण्याची संधी देते. सागरी सुरक्षेसाठी योगदान

गेल्या काही वर्षांत भारतीय तटरक्षक दलाने या प्रदेशात सागरी सुरक्षा वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. काही महत्त्वपूर्ण योगदानांमध्ये हे समाविष्ट आहे. तस्करी आणि बेकायदेशीर क्रियाकलापांना प्रतिबंध करणे- माल, अंमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी यासारख्या बेकायदेशीर क्रियाकलापांना प्रतिबंध करण्यासाठी आईसीजी सागरी सीमांवर सक्रियपणे गस्त घालते आणि देखरेख करते. दहशतवादविरोधी कारवाया- सागरी दहशतवादाच्या वाढत्या धोक्यामुळे, भारतीय तटरक्षक दल समुद्रावरील दहशतवादाच्या कृत्यांचा मुकाबला आणि प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नांमध्ये आघाडीवर आहे. शोध आणि बचाव कार्ये- सागरी अपघात आणि आपत्तींच्या वेळी आपल्या तत्पर आणि प्रभावी शोध आणि बचाव कार्यांद्वारे असंख्य लोकांचे जीव वाचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. पर्यावरण संरक्षण- सागरी प्रदूषण रोखण्यासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी सक्रिय उपाययोजना करून सागरी पर्यावरणाच्या संरक्षणात योगदान देते. क्षमता वाढवणे आणि सहयोग- भारतीय तटरक्षक दल आपली क्षमता वाढवण्यासाठी आणि प्रभावी सागरी सुरक्षेसाठी गुप्तचर सामायिक करण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा इतर सागरी एजन्सीसोबत सहयोग आहे. उपलब्धी आणि उल्लेखनीय ऑपरेशन्स- गेल्या काही वर्षांत भारतीय तटरक्षक दलाने विविध यशस्वी ऑपरेशन्सद्वारे व्यावसायिकता आणि




**भारताच्या विशाल किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी विशेष सागरी दलाची गरज सन १९७१च्या भारत-पाक युद्धादरम्यान जाणवली. भारतीय नौदलाला आपल्या संसाधनांचा एक महत्त्वाचा भाग किनारपट्टीवर पाळत ठेवण्यासाठी आणि गस्त घालण्यासाठी वळवावा लागला, ज्यामुळे देशाच्या सागरी हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या त्याच्या प्राथमिक भूमिकेत अंतर निर्माण झाले होते. ही तफावत ओळखून भारत सरकारने दि.१ फेब्रुवारी १९७७ रोजी भारतीय तटरक्षक दलाची स्थापना करून एक ऐतिहासिक पाऊल उचलले. सागरी सुरक्षा वाढवणे, तस्करी रोखणे आणि सागरी आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देणे हे प्राथमिक उद्दिष्ट होते. अधिक रोचक व ज्ञानवर्धक माहिती सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या संकलित लेखात वाचा... संपादक.**

कार्यक्षमतेसाठी नावलौकिक मिळवला आहे. काही उल्लेखनीय कामगिरीमध्ये हे समाविष्ट आहे. ऑपरेशन स्वान-१९८८- भारतीय किनारपट्टीवर प्रतिबंधित वस्तू, विशेषत: सोन्याच्या तस्करीला सामोरे जाण्यासाठी ऑपरेशन स्वान सुरू करण्यात आले. तटरक्षक दलाने अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी आपली प्रभावीता दाखवून तस्करीच्या अनेक जहाजांना यशस्वीरित्या रोखले. ऑपरेशन ताशा-१९९९- कारगिल युद्धादरम्यान, तटरक्षक दलाने भारताच्या सागरी सीमा सुरक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ऑपरेशन ताशामध्ये पाकिस्तानच्या संभाव्य नौदलाच्या धोक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि संरक्षण करण्यासाठी तटरक्षक जहाजांच्या तैनातीचा समावेश होता. शोध आणि बचाव कार्ये- तटरक्षक दलाने अनेक शोध आणि बचाव कार्ये राबवून समुद्रात असंख्य जीव वाचवले आहेत. उल्लेखनीय उदाहरणांमध्ये सन २००४च्या हिंदी महासागरातील सुनामीला मिळालेला प्रतिसाद आणि चक्रीवादळात मच्छिमारांची सुटका यांचा समावेश आहे. चाचेगिरी विरोधी ऑपरेशन्स- भारतीय तटरक्षक दलाने एडनच्या आखात आणि अरबी समुद्रात चाचेगिरीचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या उपस्थितीने या चाचेगिरी-प्रवण क्षेत्रांमध्ये शिपिंग लेनच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

भारतीय तटरक्षक दलासमोरील आव्हाने: भारतीय तटरक्षक दलाने सागरी सुरक्षेची खात्री करण्यासाठी लक्षणीय प्रगती केली असताना ती विविध आव्हानांना तोंड देत आहे, ज्यासाठी लक्ष आणि धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. तांत्रिक सुधारणा- प्रभावी सागरी पाळत ठेवण्यासाठी आणि प्रतिसादासाठी तांत्रिक प्रगतीच्या बरोबरीने राहणे महत्त्वाचे आहे. आईसीजीला आधुनिक उपकरणे आणि तंत्रज्ञानामध्ये सतत गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

कार्मिक प्रशिक्षण आणि भरती: अत्यंत सक्षम आणि प्रेरित शक्ती राखण्यासाठी कुशल कर्मचाऱ्यांची भरती आणि प्रशिक्षण आवश्यक आहे. कोस्ट गार्ड कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी पुरेशा संसाधनांचे वाटप केले जावे. पायाभूत सुविधांचा विकास- भारतीय तटरक्षक दलाला संपूर्ण किनारपट्टीवर आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी नवीन तळांची स्थापना आणि विद्यमान सुविधा अपग्रेड करण्यासह सतत पायाभूत सुविधांच्या विकासाची आवश्यकता आहे. अत्याधुनिक धोके- दहशतवाद आणि संघटित गुन्ह्यांसह सागरी धोक्यांच्या विकसित स्वरूपासाठी तटरक्षक दलाला त्याच्या क्षमतांमध्ये सतत सुधारणा करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षणामध्ये गुंतवणूक करणे अत्याधुनिक विरोधकांच्या पुढे राहण्यासाठी महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार्य: आंतरराष्ट्रीय सागरी धोक्यांना संबोधित करण्यासाठी शेजारील देश आणि आंतरराष्ट्रीय सागरी संघटनांशी सहकार्य करणे अत्यावश्यक आहे. सामुहिक सागरी सुरक्षेसाठी राजनैतिक संबंध आणि माहितीची देवाणघेवाण यंत्रणा मजबूत करणे महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय आव्हाने- पर्यावरण संरक्षणावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करून भारतीय तटरक्षक दलाला हवामान बदल, सागरी जैवविविधता आणि शाश्वत सागरी पद्धतींशी संबंधित उदयोन्मुख आव्हानांशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

भारतीय तटरक्षक दिवस सेलीब्रेशन: भारतीय तटरक्षक दिन देशभरात उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जातो. या प्रसंगी विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातात, यासह- परेड आणि समारंभ- औपचारिक परेड आणि समारंभ कोस्ट गार्ड स्टेशन्स आणि मुख्यालयात सेवा कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि सैन्याच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी आयोजित केले जातात. पुरस्कार समारंभ- तटरक्षक दलाच्या कर्मचाऱ्यांना वर्षभरात त्यांच्या अपवादात्मक सेवेसाठी आणि शौर्यासाठी ओळख आणि पुरस्कार दिले जातात. सार्वजनिक जागरुकता कार्यक्रम- भारतीय तटरक्षक दल सागरी सुरक्षा, समुद्रातील सुरक्षितता आणि देशाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाच्या भूमिकेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक पोहोच उपक्रमांमध्ये गुंतले आहे. प्रात्यक्षिके आणि प्रदर्शने- आईसीजी अनेकदा प्रात्यक्षिके आणि त्यांची उपकरणे आणि क्षमतांचे प्रदर्शन आयोजित करते, ज्यामुळे जनतेला सैन्याची तयारी आणि सज्जता प्रत्यक्षपणे पाहता येते.

भारतीय तटरक्षक दिन हा एक महत्त्वाचा प्रसंग आहे, जो केवळ महत्त्वाच्या सागरी दलाच्या स्थापनेचा उत्सवच साजरा करत नाही तर देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणाऱ्या व्यक्तींच्या समर्पणाला आणि शौर्यालाही श्रद्धांजली अर्पण करतो. भारताने सागरी क्षेत्रात आपला प्रभाव कायम ठेवल्याने भारतीय तटरक्षक दलाची भूमिका अधिकाधिक गंभीर होत आहे. सतत आधुनिकीकरण, प्रशिक्षण आणि सहकार्याद्वारे, भारतीय तटरक्षक दल समुद्रात राष्ट्राची सुरक्षा, सुरक्षितता आणि समृद्धी सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेमध्ये स्थिर आहे. या दिवशी आपण भारतीय तटरक्षक दलाच्या कर्तृत्वावर चिंतन करूया आणि आपल्या सागरी हितांचे अतूट दृढनिश्चय आणि धैर्याने रक्षण करणाऱ्या शूर पुरुष आणि महिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करूया. आपण इंडियन कोस्टगार्ड डे साजरा करत असताना या निमलष्करी दलात सेवा करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या त्याग आणि समर्पणाची कबुली देणे अत्यावश्यक आहे. देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्याची त्यांची वचनबद्धता कौतुकास पात्र आहे. पुढे पाहता, तटरक्षक दलाच्या क्षमतांमध्ये गुंतवणूक करणे सरकारसाठी महत्त्वाचे आहे, हे सुनिश्चित करून की ते आगामी वर्षांत विकसित होत असलेल्या सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी सुसज्ज राहतील. भारतीय तटरक्षक दिन दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. १९७७ मध्ये या दिवशी भारतीय तटरक्षक दलाच्या स्थापनेचे स्मरण केले जाते. भारताच्या सागरी हितसंबंधांची सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आणि सागरी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाची स्थापना करण्यात आली.

भारतीय तटरक्षक दलाची स्थापना अधिकृतपणे दि.१ फेब्रुवारी १९७७ रोजी तटरक्षक कायद्यांतर्गत करण्यात आली. भारतीय तटरक्षक दलाची प्राथमिक भूमिका म्हणजे भारताच्या सागरी हितांचे रक्षण करणे आणि देशाच्या प्रादेशिक सागरी भागात कायद्यांची अंमलबजावणी करणे. यामध्ये शोध आणि बचाव कार्य, पर्यावरण संरक्षण आणि सागरी धोक्यांचा सामना करणे समाविष्ट आहे, हे विशेष!

!! राष्ट्रीय तटरक्षक स्थापना दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!


**– संकलन व सुलेखन –**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

**गडचिरोली, फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# ‘मोदी आवास’मधून ११ हजार घरकुलांना मंजुरी उद्दिष्ट पूर्ण करणारी सोलापूर झेडपी राज्यात अव्वल

**सोलापूर :** राज्य सरकारच्या मोदी आवास योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील १० हजार २९३ ओबीसी तर विशेष मागास प्रवर्गातील ७२६ लाभार्थींच्या घरकुलांना सोलापूर जिल्हा परिषदेने मंजुरी दिली आहे.जानेवारीअखेरीस सर्व लाभार्थींना बांधकामासाठी १५ हजाराचा पहिला हप्ता मिळणार आहे. दोन महिन्यात उद्दिष्टानुसार १०० टक्के लाभार्थींना मंजुरी देणारी सोलापूर जिल्हा परिषद राज्यात अव्वल ठरली आहे.ओबीसी लाभार्थींना घरकूल बांधणीसाठी पहिला हप्ता १५ हजार रुपयांचा, दुसरा हप्ता ४५ हजार रुपये तर तिसरा हप्ता ४० हजार आणि शेवटचा हप्ता २० हजार रुपये, असे एकूण एक लाख २० हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे.तसेच ‘मनरेगा’तून मजुरीपोटी २३ हजार २८० रुपये आणि स्वच्छ भारत मिशन अभियानाअंतर्गत शौचालयासाठी १२ हजार रुपये देखील दिले जाणार आहेत. ज्या लाभार्थींना घरकूल बांधणीसाठी स्वत:ची जागा नाही, अशांना आता एक लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे.तत्पूर्वी, मोदी आवास योजनेतून पुढील दोन वर्षात आणखी २४ हजार लाभार्थींना घरकूल मिळणार आहेत. या योजनेच्या लाभार्थींकडे जात प्रमाणपत्र बंधनकारक आहे. पहिल्या वर्षीचे उद्दिष्ट विलंबाने प्राप्त झाले होते,तरीदेखील जिल्हा परिषदेने अवघ्या दोनच महिन्यात १०० टक्के लाभार्थींचे प्रस्ताव मागवून त्यांना मंजुरी




दिली आहे हे विशेष. राज्यातील इतर कोणत्याही जिल्हा परिषदेने २०२३-२४मधील १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही.ोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे महाराष्ट्रावर विशेष लक्ष आहे. जानेवारीत त्यांनी नाशिक, मुंबई व सोलापूर असा दोनदा दौरा केला आहे. आता राज्य सरकारच्या महत्त्वपूर्ण योजनांच्या लोकार्पणासाठी पंतप्रधान मोदी हे फेब्रुवारी महिन्यात पुन्हा महाराष्ट्र दौऱ्यावर येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.त्यावेळी राज्यातील सव्वातीन लाख ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील बेघर लाभार्थींना घरकूल बांधणीचा पहिला हप्ता (प्रत्येकी १५ हजार रुपये) पंतप्रधानांच्या हस्ते वितरित होणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले. नमो शेतकरी महासन्मान योजनेनंतर महाराष्ट्र सरकारने मोदी आवास योजना देखील पंतप्रधानांच्याच नावे सुरू केली आहे.

# सोलापुरात रात्री थंडीचा कडाका, दिवसा उन्हाचा चटका

**सोलापूर :** शहर व परिसरात दिवसाचे कमाल तपमान व रात्रीचे किमान तापमानातील तफावत वाढल्याने नागरिकांना या बदलाचा त्रास होऊ लागला आहे. अनेकांना अस्वस्थता, ताप आदी लक्षणामुळे दवाखान्यात जाण्याची वेळ आली आहे.मागील आठवड्यापासून अचानक वातावरणात मोठा बदल झाला आहे. थंडीची लाट आली आहे. तरीही प्रत्यक्षात दिवसाच्या कालावधीत कडक उन्हाचा चटका लागत आहे. रात्रीच्या वेळी मात्र थंडीचा जोर वाढून किमान तपमान अत्यंत कमी होत आहे.दिवस व रात्रीच्या कमाल व किमान तापमानातील तफावत १० अंशाच्या पेक्षा अधिक आहे. मागील आठवड्यात एक दिवस किमान व कमाल तापमानातील फरक दुपटीपर्यंत पोचला होता. त्यामुळे अनेकांना आजारांचा त्रास होऊ लागला आहे.त्यातच तेल मसाजासारखे प्रकार न केल्याने



त्वचेचा कोरडेपणा वाढून देखील त्रास होत आहे. त्वचेला भेगा पडणे, त्वचेची आग होणे असे प्रकार होत आहेत. कडाक्याच्या थंडीत उबदार कपडे न वापरल्याने सांधेदुखीचा त्रास होऊ लागला आहे. त्यामुळे दवाखान्यात ताप, सर्दी व खोकल्याच्या रुग्णांची गर्दी वाढत आहे.


# ऊसतोड मजुरांचा पट्टा असणाऱ्या भागाची ओळख आता स्पर्धा परिक्षेतील मुलांच्या यशामुळे बदलत आहे-खा.डॉ.प्रितमताई मुंडे

## सामाजिक क्षेत्रात गिते कुटुंबीय अग्रेसर-आ.सुरेश धस

**पाटोदा । प्रतिनिधी**

आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती अत्यंत वेगळ्या स्वरूपाची आस्था निर्माण झाली आहे ही बाब निश्चितच आनंददायी आहे, ऊसतोड मजुरांचा पट्टा असलेल्या या भागाची ओळख आता हळूहळू बदलत असून हा भाग आता एमपीएससी यूपीएससी अशा स्पर्धा परीक्षातील यशस्वी विद्यार्थी व अधिकाऱ्यांचा भाग म्हणून येत्या काही काळात ओळखला जाणार आहे. श्रीहरी गिते पाटील आणि त्यांच्या कुटुंबाचे सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे या कुटुंबातील प्रसाद या मुलाने मेहनतीने मिळवलेले यश हे निश्चितच गौरवास्पद असून दिपाने मिळवलेल्या यशामुळे मुली ही या क्षेत्रात कमी नाहीत हे सिद्ध झालेले आहे. आता या दोघांनीही प्रशासकीय सेवेत राहून लोकसेवेचा वसा जोपासावा असे प्रतिपादन बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी केले.

पाटोदा नगर पंचायतचे सभापती श्रीहरी गिते पाटील यांचे पुतणे प्रसाद मुकुंद गिते यांनी एमपीएससी परीक्षेत यश मिळवले त्यांच्या यशाबद्दल त्यांच्या नागरी





सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, विधान परिषद सदस्य आमदार सुरेश धस, ह.भ.प.रामकृष्ण रंधवे, ह.भ.प.महंत राधाताई महाराज, गटनेते बळीराम पोटे, माजी जि.प.सभापती महेंद्र गर्जे, नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव, सुधीर घुमरे, नगरसेवक सुशिल कोठेकर, अँड.अशरफ सय्यद, सोमीनाथ कोल्हे, अँड. जब्बार पठाण, ह.भ.प.पांचाळताई, येवले महाराज, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम पठाण, सेवानिवृत्त पीएसआय मुकुंद गिते, पाटोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनमोल केदार, रामेश्वर पंपु गोरे, रोहीदास गिते, भाऊसाहेब भवर, माजी मुख्याध्यापक एल.आर.जाधव यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी आ.सुरेश(आण्णा) धस यांच्या वाढदिवसानिमित्त नगर पंचायत बांधकाम सभापती श्रीहरी गिते पाटील यांच्या वतीने गरजू महिलांना ३०० साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच आ.सुरेश (आण्णा)धस यांच्या वाढदिवसा निमित्ताने एका गरीब हिराबाई पिंपळे या कुटुंबाला घरकुल योजनेच्या मिळालेल्या रक्कमे व्यतिरिक्त अजुन काही आर्थिक मदत करुन घर बांधून दिले. या पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलाचे रिबीन कापुन खा.डॉ.प्रितमताई मुंडे व आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी पाटोदा शहरातील व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती श्रीहरी गिते पाटील यांनी तर सुत्रसंचलन एल.आर.जाधव सर यांनी केला. तर आभार अँड.सुधीर घुमरे यांनी मानले.

# हळदी-कुंकू कार्यक्रमातून महिला सक्षमीकरणाचा नारा

## अहेरी नगरीत सर्व महिला आल्या एकत्र;माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांचा पुढाकार

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुका मुख्यालयातील इंडियन पॅलेस फंक्शन हॉल येथे माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी तीळ-गुळ व हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यानिमित्त पारंपरिक सणाला आधुनिकतेची जोड देत महिला सक्षमीकरण,स्वसंवरक्षण यावर जनजागृती करण्यात आली.या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महिलांनी मोठ्या संख्येनी सहभाग घेतला. मकर संक्रांती निमित्त मंगळवारी अहेरी येथील इंडियन पॅलेस फंक्शन हॉल येथे आयोजित हळदी कुंकू कार्यक्रमात महिलांची ओटी भरून त्यांना वाण देण्यात आले.त्यानंतर महिला सक्षमीकरणबाबत जनजागृतीपर विचार मांडून स्वसंवरक्षणबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच अनेक मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व विविध समाजातील जवळपास ८०० महिलांची उपस्थिती होती.सार्वजनिक हळदी कुंकू कार्यक्रमातून विविध सामाजिक संदेश देत एका अनोख्या पध्दतीने संक्रांत साजरी केली. मकरसंक्रांत म्हंटले की, महिलांचा जिव्हाळ्याचा विषय येतो.संक्रांतीनिमित्त महिला आपल्या घरी हळदी कुंकू कार्यक्रम ठेवत वाण म्हणून एकमेकींना भेटवस्तू देतात.मात्र,माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री ताई आत्राम यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पारंपारिक पद्धतीमध्ये थोडा बदल करत सर्व महिलांना एकत्र करून सार्वजनिक हळदी कुंकू कार्यक्रम घेतले. विशेष म्हणजे केवळ हळदी कुंकू कार्यक्रम न ठेवता सदर कार्यक्रमाअंतर्गत विविध सामाजिक संदेशाची वाणाच्या रूपात देवाणघेवाण केली.या कार्यक्रमात पैठणीचा जिंकू मान,हळदी कुंकवाचे लुटू वाण, महिला बघिनिंचा सन्मान आनंदाला येईल उधाण. या संकल्पनेतून लकी ड्रॉ काढून विजेत्या महिलेला सोन्याची नथ व एक पैठणी बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रवादी महिला व युवती काँग्रेसच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



**विधवा महिलांचा केला सन्मान**

**भारतीय संस्कृतीत हळदी कुंकुला विशेष महत्त्व आहे.हळदी कुंकू म्हणजे सौभाग्याचं लेण.पण,आज ही प्रथा आकुंचित झालेली आहे.हळदी कुंकच्या निमित्ताने स्त्रिया एकत्र येऊन एकमेकांविषयी आदर आणि प्रेमभाव व्यक्त करतात.मात्र,विधवा स्त्रियांना हळदी कुंकू कार्यक्रमात सहभागी करून घेतले जात नाही.या कार्यक्रमात भाग्यश्री आत्राम यांनी त्यांना हळदी कुंकुचा मान दिल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले.**

# आजपासून डब्ल्यूएसएफ चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ)व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा पुरुष गट व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन लोकमान्य महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलेले आहे.



लोकशिक्षण संस्थेमधील व्हॉलीबॉल या खेळाला ५१ वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल लोकमान्य महाविद्यालय, वरोरा (स्व. मनोहरभाऊ पाटील क्रीडा परिसर) येथे दिनांक १फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान डब्ल्यूएसएफ चषक व्हॉलीबॉल स्पर्धा दिवस- रात्र पद्धतीने आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेकरिता तीन मैदाने सज्ज करण्यात आलेली असून तीन मैदानावर विद्युत प्रकाश झोताची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील किमान २८ जिल्हा संघ सहभागी होतील.स्व. संजय जीवतोडे, स्व. ईश्वर चांदेकर, स्व. ऋषी पिदुरकर यांचे स्मरणार्थ विजेत्या संघांना चषक दिल्या जाणार असून स्व. बापूरावजी काळे, स्व. सुधाकरजी डाखरे, स्व. रवींद्रजी करमरकर, स्व. शोभाताई मत्ते, स्व. गजानन गेडाम यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट खेळाडूंना चषक दिले जाणार आहेत.या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी गडचिरोली जिल्हा क्रीडा अधिकारी प्रशांत दोंदल यांचा सपत्निक सत्कार करण्यात येणार असून स्पर्धेचे उदघाटन वरोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेसी ( आयपीएस) हे असणार आहे. स्पर्धेचे स्वागताध्यक्ष लोक शिक्षण संस्था वरोडा चे अध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील असून मुख्य पाहुणे म्हणून राजाराम बापू पाटील साखर कारखाना इस्लामपूर जिल्हा सांगलीचे चेअरमन व महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रतीक जयंत पाटील हे असणार आहे. या प्रसंगी पाहुणे म्हणून वरोरा चे माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, प्राचार्य अशोक जीवतोडे सचिव,चांदा शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर, लोकशिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळपाटील ,वरोराच्या उप विभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, एसडीपीओ नयोमी साटम (आयपीएस), नागपूर विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, मुकेश जीवतोडे शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा) , डॉ. कपिल गेडाम न्यूरोलॉजिस्ट चंद्रपूर ,सामाजिक कार्यकर्ते किशोर टोंगे, एक्सलंट अकॅडमीचे संचालक अभय टोंगे, ड. गजानन बोढाले हे राहणार आहेतस्पर्धा यशस्वी करण्याकरिता वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ) चे अध्यक्ष गजानन जीवतोडे, किशोर पीरके, सुनील बांगडे , मिलिंद कडवे, विनोद उमरे, राजेश मत्ते, हेमंत घिवे महाराष्ट्र वॉलीबॉल संघटनेचे सचिव विरल शहा व सर्व सहकारी प्रयत्न करीत आहेत.

# बद्दी पोचम्मा बोनालू उत्सवाला भाग्यश्री आत्राम यांची उपस्थिती



**अहेरी । प्रतिनिधी**

कोलपल्ली येथे आयोजित बद्दी पोचम्मा बोनालू उत्सवाला माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी उपस्थित राहून पूजाअर्चा करत आशीर्वाद घेतले.

कोलपल्ली येथे दरवर्षी बद्दी पोचम्मा बोनालू उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.यंदा सुद्धा २८ ते २९ जानेवारी दरम्यान हा उत्सव साजरा केला जात आहे.२८ जानेवारी रोजी माता पूजन व २९ जानेवारी रोजी बोनालू कार्यक्रम संपन्न झाला.बोनालू कार्यक्रमात माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी कोलपल्ली येथे उपस्थित होऊन या कार्यक्रमात सहभागी झाले.गावातील माता मंदिरात पूजा करत त्यांनी आशीर्वाद घेतला.तर बोनालू उत्सवात महिलांसोबत रॅलीत सहभागी होत त्यांचा उत्साह वाढविला.यावेळी सरपंच लक्ष्मण कन्नाके, व्येंकटरावपेठाचे सरपंच नीलक्का गेडाम, व्येंकटरावपेठाचे उपसरपंच किशोर करामे,ग्राम कोष अध्यक्ष रवी सडमेक,ग्रा पं सदस्य रीमा मडावी,शुभम आत्राम, शैलेश गेडाम, नागेश पेंदाम,ताजु कुडमेथे,बुच्चा आत्राम,संतोष सडमेक,प्रदीप आत्राम,मनोज सोयाम, मुकेश आत्राम, पवन सोयाम,उमेश अर्का,अरुण सडमेक व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिरोंच्या येथे पुरुष बॅडमिंटन स्पर्धेचं बक्षीस वितरण संपन्न

## बॅडमिंटन स्पर्धेला राजे अम्ब्रिशराव आत्राम यांची विशेष उपस्थिती

**सिरोंचा । प्रतिनिधी**

स्थानिक क्रीडा संकुल आलापली येथे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या सहकार्याने तीन दिवसीय पुरुष बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. या पुरुष बॅडमिंटन स्पर्धाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते अवधेश्वशराव बाबा आत्राम हे होते. यावेळी पाहुण्यांचे शाल श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



यावेळी तीन दिवसीय चालणाऱ्या पुरुष बॅडमिंटन स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणावर बॅडमिंटन स्पर्धकानीं सहभाग नोंदविला होता.बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी शुभेच्छा दिल्या.बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष डबल प्रथम क्रमांक विजेत्या संघाला ट्रॉफी व तीस हजार रुपयेआणि द्वितीय क्रमांक विजेत्या संघाला ट्रॉफी व पंधरा हजार रुपये तसेच पुरुष सिंगल क्रमांक विजेत्या संघाला ट्रॉफी व दहा हजार रुपये आणि द्वितीय क्रमांक विजेत्या संघाला ट्रॉफी व पाच हजार रुपये सर्व विजेत्या स्पर्धकांना माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम व युवा नेते अवधेश्वरराव बाबा आत्राम यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.या कार्यक्रमाला सिरोंचा तालुका ग्रामीण अध्यक्ष शंकर नरहरी व तालुका शहर अध्यक्ष दिलीप सेनिगरपू व रंगू बापान्ना, संतोष पडाला,तसेच भाजपाचे पदाधिकारी,स्थानिक कार्यकर्ते, बॅडमिंटन स्पर्धक व प्रतिष्ठित नागरिक,युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हत्तीरोग निर्मूलनाची प्रभावी अंमलबजावणी करा -सीईओ विवेक जॉन्सन

## १० तालुक्यात हत्तीरोग दूरीकरण औषधोपचार मोहीम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम १० ते २३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. सदर मोहीम जिल्ह्यातील १० तालुक्यात राबविण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून सदर अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.जिल्हा परिषदेतील जनपद सभागृहात जिल्हा समन्वय समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलींद कांबळे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार आदी उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढे सांगितले की हत्तीरोगाच्या निर्मूलनासाठी जिल्ह्याचा मास्टर प्लॅन तयार करावा. हत्तीरोगाचे रुग्ण अधिक आहे अशी तालुके व बाधित गावांची यादी तयार करावी. सार्वत्रिक औषधोपचार मोहीम प्रभावीपणे राबविणे, हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेत लोकसहभाग वाढविणे, तसेच मोहिमेपूर्वी तालुकास्तरावर तालुका समन्वय समितीमार्फत बैठक घेणे तसेच सदर मोहिमेची व्यापक जनजागृती करून मोहीम १०० टक्के यशस्वी करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत संबंधित यंत्रणांना दिल्या.क्युलेक्स नावाचा डास चावल्याने हा आजार होते. चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा आहे. धानाचे उत्पादन जास्त असलेल्या तालुक्यांमध्ये हत्तीरोगाचे रुग्ण अधिक प्रमाणात आढळून येतात. सदर मोहीम जिल्ह्यातील चंद्रपूर ग्रामीण, भद्रावती, राजुरा, पोभुर्णा, गोंडपिपरी, मुल, सावली, सिंदेवाही, ब्रह्मपुरी व चिमुर या तालुक्यात राबविण्यात येणार आहे.सदर मोहिमेदरम्यान नागरिकांनी आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत दिलेल्या गोळ्या त्यांच्यासमोरच खाव्यात व ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे,असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

# खासदार अशोक नेते संसद आदर्श पुरस्काराने सन्मानीत

## सातव्या युवा संसदेत खा.अशोक नेते यांचा 'आदर्श खासदार' म्हणून सन्मान

**गडचिरोली । प्रतिनिधी**

पुणे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट्स यांच्याकडून आयोजित दोन दिवसीय युवा संसदेत दि.२९ जाने.ला राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. त्यात राज्याच्या टोकावरील गडचिरोली-चिमुर क्षेत्राचे खासदार तथा भाजपच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते यांना आदर्श खासदार म्हणून सन्मानित करण्यात आले.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली या युवा संसदेचे उद्घाटन करण्यात आले. या सत्कार कार्यक्रमाला माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, माजी खासदार विकास महात्मे, जाधवर ग्रुपचे संस्थापक प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, माजी महापौर दतात्रय धनकवडे, नगरसेवक गणेश बिडकर, कार्यक्रमाचे आयोजक शार्दुल जाधवर, तसेच मोठ्या संख्येने युवक-युवती उपस्थित होते.तीन सत्रात झालेल्या या युवा संसदेत सामाजिक चळवळ आणि युवक,सशक्त युवा, सशक्त राजकारण, सशक्त भारत, भारतीय राजकारणाची ७५ वर्षे - किती नैतिक, किती अनैतिक? अशा तीन विषयांवर मंथन करण्यात आले. यावेळी आपल्या भाषणात खा.अशोक नेते यांनी युवकांनी चांगले काम करण्यासाठी चांगले ध्येय ठेवण्यासाठी युवकांना सल्ला दिला. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात विपरित परिस्थितीमध्ये आणि शेकडो किलोमीटरपर्यंत विस्तारलेल्या लोकसभा क्षेत्रात सर्वदूर संपर्क ठेवताना अनेक अडचणी येतात. पण या क्षेत्राच्या संपूर्ण विकासासाठी भविष्यातही मी कार्यरत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोबतच दिलेल्या सन्मानासाठी त्यांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले. राजकारण, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि पत्रकारिता या चार स्तंभाच्या आधारावर आपल्या लोकशाहीचा पाया मजबूतपणे उभा आहे. हे चारही घटक समाजव्यवस्थेत महत्वाचे आहेत. राजकारणाकडे सकारात्मक दृष्टिने पाहिल्यास त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामुळे युवा वर्गाने सामाजिक हितासाठी राजकारणात येण्याचे आवाहनही यावेळी खा.नेते यांनी केले.

**विपरित परिस्थितीमध्ये करत आहेत प्रतिनिधीत्व**

सशक्त भारत बनविण्यासाठी युवांना व्यासपीठ मिळवून देणे, युवकांमध्ये राजकीय आणि सामाजिक भान निर्माण करून त्यांच्या सुप्त कला गुणांना संधी देऊन सक्षम भारताच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीस योगदान देणे हा उद्देश ठेवून काम करताना जे समाजापयोगी चांगले काम करतात, अशा लोकांना जाधवर ग्रुपकडून सन्मानित करण्यात येते. गडचिरोलीचे दोनदा आमदार आणि आता दोनदा खासदार म्हणून अशोक नेते यांनी विपरित परिस्थिती असलेल्या भागाचे प्रतिनिधीत्व केले. आपल्या राजकीय प्रवासात त्यांनी या अविकसित क्षेत्रात दळणवळणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला. याशिवाय रेल्वे, मेडिकल कॉलेज बरोबरचं आरोग्य, शिक्षण, सिंचन क्षेत्रात, महामार्ग या क्षेत्रात उल्लेखनिय योगदान देऊन या भागातील अनेक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन दरबारी पाठपुरावा केला. त्यामुळे त्यांची या बहुमानासाठी निवड केली होती अस मत यावेळी करत या दहा वर्षाच्या कार्यकाळामध्ये नरेंद्र मोदी जी यांनी केंद्र सरकारच्या कार्यकाळ अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.अनेक युवकांसाठी, सर्व सामान्य जनतेसाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या.नरेंद्र मोदी जी यांनी केलेल्या कार्याची स्तुती करत खा.नेते यांनी आपल्या भावना पुरस्कार या कार्यक्रमा प्रसंगी पुरस्कार घेतांना व्यक्त केल्या.



**दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन**

या कार्यक्रमासाठी पुण्यात आले असताना खा.अशोक नेते यांनी सोमवारी संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने सुप्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात कुटुंबियासह दर्शन घेऊन आरती व पुजा केली. यावेळी अर्चना अशोक नेते, मुलगी अशिता हेसुद्धा उपस्थित होते.

# डॉ.विवेक शिंदे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे थाटात समारोप




**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील चोरा येथे आयोजित केलेल्या स्थानिक डॉ. विवेक शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे अत्यंत थाटात समारोप पार पडले. चोरा येथील स्वर्गीय मातोश्री यमुनाबाई शिंदे विद्यालय परिसरात आयोजित केलेला या शिबिरात ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रमोद कृष्णराव पाठक शिबिराचे उद्घाटक भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती चे अध्यक्ष डॉक्टर विवेक शिंदे प्रमुख अतिथी संस्था सचिव डॉ.कार्तिक शिंदे , प्राध्यापक डॉ.प्रशांत पाठक, डॉ. जयंत वानखेडे , सरपंच संगीता खीरटकर, उपसरपंच विलास जीवतोडे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम सह अधिकारी प्राध्यापक नेहा वसंत मानकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रमोद पाठक यांनी प्रास्ताविकेतून देशाच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासात जागृत मतदाराची भूमिका या संकल्पनेवर आधारित जागरूक मतदार तसेच या शिबिराचा महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जीवनात निर्माण होणार आहे व एन एस एस चा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या गुण कौशल्यांना वाव देणे आहे हे स्पष्ट केले. डॉक्टर विवेक शिंदे यांनी म्हटले की प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात पुस्तक जसे महत्त्वाचे आहे तसेच त्याच्या अंतर्गत कला आणि गुणांना वाव देणे महत्त्वाचे आहे तरच तो जीवनात पुढे जाऊ शकेल त्यांच्या कलागुणांना वाव द्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉक्टर कार्तिक शिंदे यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की जागतिक परिस्थितीमध्ये स्पर्धा परीक्षेतून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे व सामाजिक सेवा याला महत्त्व द्यावे हे स्पष्ट केले. समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आलेले डॉक्टर जयंत वानखडे यांनी लोकशाहीचा खरा आधारस्तंभ हा तरुण युवक आहे लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सामाजिक सेवे सोबतच कौशल्य कुणाला भाव द्यावा व लोकशाहीचा विकास घडवावा हे त्यांनी आपल्या शब्दातून स्पष्ट केले. चांगले शासन चालवण्यासाठी चांगल्या प्रतिनिधींना निवडून दिले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी खेड्यातील जनजीवन कसे असते ते सुद्धा जवळून पहावे व खेड्यातच देशाचा विकास आहे याकरिता विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या शिबिरामध्ये भाग घेतला पाहिजे असे आवाहन डॉ.प्रशांत पाठक यांनी केले. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक नेहा वसंत मानकर यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रज्ञा लांडे यांनी मांडले. या शिबिराच्या समारोपीय यशस्वीतेसाठी प्राध्यापक कपिल राऊत, विद्यार्थी रोहन आसामपल्लीवार रुपेश आसवले, यांनी सहकार्य केले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा व प्रजासत्ताक दिनानिमित्त कवि संमेलन



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय सिद्धार्थ नवयुवक वाचनालयाच्या वतीने दि.२६ ला कवि संमेलन आयोजित करण्यात आले. सुवालाल पाटणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भुषण रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कवि संमेलनात २० कवींनी आपल्या कविता सादर केल्या. संजय ओरके यांनी सामाजिक भयावहतेतुन विस्कटलेले ऐक्य

कैसे बचाऊ मै तुम्हे बिखरने से, टूटने के वास्ते बनाई है या कवितेतून मांडले. डॉ.भूषण रामटेके यांनी ज्वलंत व भयावह मानसिकतेतून अंतर्मुख करणारी मी महाबोधी सोडवण्यासाठी न्यायाच्या प्रतीक्षेत ही कविता सादर केली. जातीयता या कवितेतून चंद्रकांत शहाकार यांनी जातीपातीच्या विषाने माणुसकी कशी हरवली ? याची विदारकता विषद केली.किरण उपाध्ये यांनी भुकनगरी या कवितेतून पोटाच्या भुकेपाई माणुस हवालदिल होऊन कसा बळी ठरतो, याचे वर्णन केले.देशातील विदारक परिस्थिती, एकता, अखंडता, माणुसकी जपणे इत्यादी विषयावर इतर कवींनी सुंदर गुंफन करून कविता सादर केल्या. यामध्ये सोपान दातार, पद्माकर अंबादे, वसंत करोडे, सुरेश मेश्राम, दिलिप थुल, आनंद पाटील, मनोहर मानवटकर, लालबहादूर यादव, प्रफुल ढेपे, एम. डी. जांभुळकर, जयश्री चव्हाण यांनी कविता सादरीकरण केले.वाचनालयाचे सचिव रविंद्र बोदेले यांच्या गायनाने कार्यक्रमांची रंगत वाढली. कार्यक्रमाचे संचालन संजय ओरके यांनी तर आभार प्रदर्शन वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद कळवळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचनालयाचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांची सिरोंचा येथील वल्ली हैदर शाह उर्स उत्सवाला भेट



**सिरोंचा । प्रतिनिधी**

राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या सिरोंचा येथे दरवर्षी होत असलेल्या हजरत वली हैदर शाह उर्स व कव्वाली कार्यक्रमाला राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी भेट देऊन चादर चढवत दर्शन घेतले.सिरोंचा तालुक्यात दरवर्षी उर्स महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.येथे होणाऱ्या उर्स जत्रेला अनेक वर्षांची परंपरा आहे. हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणूनही या उर्स कडे पाहिले जाते.यानिमित्ताने होणाऱ्या उर्स संदल, कुराण पठण, ध्वज चढविणे आदी कार्यक्रम व कव्वाली पाहण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यासह लगतच्या तेलंगाणा व छत्तीसगड राज्यातील सर्वधर्मीय भाविक मोठ्या संख्येने येतात.२८ जानेवारी रोजी पहिल्याच दिवशी मंत्री धर्मराव बाबा आत्राम,माजी जि प अध्यक्ष भाग्याश्री आत्राम आणि युवानेते ऋतुराज हलगेकर यांनी भेट घेऊन चादर चढवत समस्त जनतेला सुख-शांती,समाधान व उत्तम आरोग्य लाभावे असे वल्ली हैदर शाह बाबाकडे प्रार्थना केली.दरम्यान मस्जिद दरगाह कब्रस्थान ईदगाह ट्रस्ट कमिटी तर्फे पाहुण्यांचे भले मोठे हार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## जिमलगट्टा येथे जलशुद्धीकरण संयंत्र केंद्र उभारले

### मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या हस्ते झाले लोकार्पण



**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील जिमलगट्टा येथील जलशुद्धीकरण संयंत्र केंद्राचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम,युवा नेते ऋतुराज हलगेकर,सरपंच पंकज तलांडी, उपसरपंच वेंकटेश मेडी, ग्रा प सदस्य रुपाली तलांडी, किरण जणघरे, रक्षीका पोरतेट तसेच गावातील प्रतिष्टीत नागरिक उपस्थित होते.

जिमलगट्टा येथील नागरिकांच्या दृष्टिकोनातून पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे यासाठी ग्रामपंचायत तर्फे गावातच जलशुद्धीकरण संयंत्र केंद्र उभारण्यात आले.यासाठी मोठी निधी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी उपलब्ध करून दिली होती.नुकतेच जलशुद्धीकरण संयंत्र केंद्राचे काम पूर्ण झाले असून मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.ग्रामपंचायत प्रशासनाने पुढाकार घेऊन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे समस्या मांडल्याने त्यांनी त्वरित निधी उपलब्ध करून दिली.अखेर जिमलगट्टा वासीयांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था झाली असून येथील नागरिकांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

## हिंगणघाट शहरातील राम मंदिर व मुजुमदार वॉर्ड येथील शेकडो कार्यकर्त्यांनी केला महिलांसह भाजपात प्रवेश

### आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

दि. ३० रोजी हिंगणघाट शहरातील राम मंदिर वॉर्ड व मुजुमदार वॉर्ड येथील बहुसंख्य महिला व युवा कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन दि. ३० रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने सविता वाकडे, रंजना पवार, नीलिमा वाकडे ,नीता बनसोड, पूजा अवघडे, वर्षा ठमके, गजानन वाकडे, वासुदेव उमक ,गोपाल वडमे ,संजय साळवे, रवी वेलगंदेवार, शेषराव हरबूडे, श्रीरामजी राऊत, जितेंद्र नंदनवार, मधुकर सहारे , रवी अवघडे, सुमित राऊत, महेंद्र नंदनवार, बंटी सायंकार ,अजय वडमे ,गणेश देवारे, शाहिद कुरेशी, सौरभ जयस्वाल, संकेत सोयाम, वैभव शर्मा, समीर मांजरे, अक्षय भोयर, ताराचंद देवारे ,धनराज नवघरे, संघर्ष पाटील, लोकेश वावरे, शुभम भेसरे, प्रशांत सहारे, पुरुषोत्तम वाकडे,रोहित यादव, उज्वल वाकडे, संदीप ठमके ,रोहित कन्नाके, कृणाल वाकडे, अमित राऊत, अजय खाटीक, आशिष भोईकर, आदित्य वलके, अनिकेत पाटमासे, कृणाल वाघमारे, शुभम ढाले ,बादल साळवे, प्रज्वल लालसरे, हर्षल वाकडे, कोयल मेंढुले, विनायक गुरणुले, लता गायकवाड, सारिका दोनारकर, शालू उईके, कांता पवार ,गंगा मेश्राम, माधुरी



आडे, रेखा कुमरे, सुनीता हुलके, चंद्रकला परमगाळे, स्वाती धोटे, भारती थुटे, वंदना तामगाडगे, प्रणाली वासेकर, नुरजा शेख, कल्पना कुमरे , ज्योती निमजे, सुनीता मडावी, सोनू बिजवार, सीता किन्नाके, अभिजीत देवाडे, दिनेश कोवे, लखन कांबळे, शंकर तिखट, पराग हरबूडे, नीलिमा वाकडे, रंजना पवार, नीता लामफासे, कविता सहारे, सुरेखा येलगंदेवार, नंदनवार , छाया गोमासे, अलका कन्नाके, सोनू देशकर, मोहुरले, भारती साळवे, अर्चना वडभे, चंदा राऊत, सविता मांजरे, अंजू मांजरे, वनिता निनावे, सुमित्रा येटे , रेखा सायंकार ,पूजा सावळे, कुसुम निकोडे, पूजा ढोरे, रंजना, साधना शिंदे, अर्चना भेंडे, बेबी चकाटे, प्रिया कुमावत, स्वीटी काटकर, सिंधू शेंडे ,कांचन निकोडे, शोभा निकोडे, वर्षा ठमके, गंगाताई, कमली गेडेकर, सुनीता साळवे, रत्नमाला दलाल, कलावती सहारे, तिजारे, सोनू पेंदाम, मंगला राजनहिरे, स्वीटी पेंदाम, मीना तिजारे, लता नागरीकर, वर्षा नागरिकर ,कविता वडमे , अस्मिता वडमे ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला.

उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा किसान मोर्चा प्रदेश महामंत्री मिलिंद भेंडे, भाजपा जिल्हा सचिव आशिष पर्बत, भाजपा जिल्हा सचिव प्रा. किरण वैद्य, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष छाया सातपुते,भाजपा शहर अध्यक्ष भूषण पिसे, शहर भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष संजय माडे, सुभाष कुंटेवार, समाजसेवक सुनील डोंगरे, महिला शहर अध्यक्षा रविला आखाडे, विधानसभा प्रमुख नलिनी सयाम, समीर धारकर, राजु जोशी, कौसर अंजुम, शितल खंदार, वंदना कामडी, वैशाली सुरकार इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

## 'स्पर्श'कुष्ठरोग जनजागृती अभियानात सहभागी व्हा-विवेक जॉन्सन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या पंधरवाड्यात 'स्पर्श'- कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. यात विविध आरोग्य शिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असून १० फेब्रुवारी रोजी 'रन फॅार लेप्रसी मॅरेथॉनचे' आयोजन गांधी चौक ते जनता कॉलेज व परत गांधी चौक या मार्गाने करण्यात आले आहे. या उपक्रमात नागरिकांनी उत्फुर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची सभा श्रीविवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा परिदेच्या जनपद सभागृहात घेण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलींद कांबळे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार आदी उपस्थित होते. 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत विविध शाळांमध्ये प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा व पथनाट्याचे आयोजन करण्यात येणार असून विजेत्या स्पर्धकांना बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. 'कलंक कुष्ठरोगाचा मिटवू या, सन्मानाने स्वीकार करूया' हे यावर्षीच्या स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाचे घोषवाक्य आहे.

## विभागीय बालपरिषदेत मूर्ती शाळेच्या शिरपेचात दुहेरी मुकुट

**राजुरा । प्रतिनिधी**

सलाम मुंबई फाऊंडेशन मुंबई, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागपूर, नाशिक व अमरावती या तिन्ही विभागातील सर्व जिल्ह्यातील तंबाखू विरोधी यंग लिडर्स विद्यार्थ्यांकरीता दि. ३० जानेवारी २०२४ ला आयोजित विभागीय ऑनलाईन बालपरिषद २०२४ मध्ये जि. प. उच्च प्राथमिक शाळा मूर्ती, केंद्र नलफडी, पं. स. राजुरा येथील विषय शिक्षक मनीष अशोकराव मंगरूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अस्मिता शिवाजी डाखरे, वर्ग ८ वा या विद्यार्थीनीने राजेंद्र शिंदे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद वाशिम यांच्या सोबत प्रश्नोत्तरे रूपात संवाद साधला. तर या बालपरिषदेचे संयुक्त सुत्रसंचलन मूर्ती येथील विषय शिक्षक मनीष अशोकराव मंगरूळकर यांनी केले.

बालपरिषद म्हणजे शालेय विद्यार्थ्यांच्या हक्काचे व्यासपीठ. त्यात अस्मिताने सर्वप्रथम सादर केलेल्या तंबाखू विरोधी जनजागृती कार्याचे वाशिम जिल्हा शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे यांनी खूप कौतुक व हार्दिक अभिनंदन केले आणि त्यानंतर अस्मिताने विचारलेल्या प्रश्नाला सविस्तर व सकारात्मक उत्तर त्यांनी दिले. नागपूर, नाशिक व अमरावती या तीनही विभागातील सर्व जिल्ह्यातील यंग लिडर्स विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी बालपरिषदेला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले राजेंद्र शिंदे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) , जिल्हा वाशिम , श्रीकांत माने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कारंजा लाड, जिल्हा वाशिम, डॉ मनीष बत्रा , दंत शल्य चिकित्सक, जिल्हा




मौखिक आरोग्य अधिकारी, जिल्हा भंडारा, डॉ शैलेश कुकडे कार्यक्रम व्यवस्थापक एन्टीसीपी , सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा भंडारा, रामदास आर. धनगर, मुख्य संपादक वत्सगुल्मा मीडिया नेटवर्क, जिल्हा वार्ताहर डी डी न्यूज व हितवाद हे उपस्थित होते.या विभागीय ऑनलाईन बालपरिषदेसाठी अस्मिता शिवाजी डाखरे, हिच्यासह मूर्ती शाळेतील कुंदन शालिक लांडे, वर्ग सातवा, तेजस्विनी रोशन ताकसांडे, वर्ग आठवा,जानवी सुरेंद्र वडस्कर, वर्ग सातवा, श्रीजल रमेश शेरकी, वर्ग सातवा असे एकूण पाच विद्यार्थीगण व मार्गदर्शक शिक्षक मनीष मंगरूळकर यांनी मागील तीन महिन्यांपासून बालपरिषदेचे संपूर्ण ११ ऑनलाईन प्रशिक्षण सत्र पूर्ण केले. शाळा व गाव स्तरावर अतिशय प्रभावीपणे तंबाखू विरोधी जनजागृती केली. त्यामुळेच अस्मिता शिवाजी डाखरे व मनीष अशोकराव मंगरूळकर यांची निवड विभागीय ऑनलाईन बालपरिषदेसाठी करण्यात आली. आणि त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले. त्याबद्दल मूर्ती येथील या विद्यार्थी यंग लिडर्सचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.विभागीय ऑनलाईन बालपरिषदेतील आत्मविश्वासपूर्ण सक्रिय सहभागाबद्दल तसेच मूर्ती शाळेचे नाव विभागीय पातळीवर उंचावल्याबद्दल अस्मिता शिवाजी डाखरे व मनीष अशोकराव मंगरूळकर यांचे अभिनंदन करून हेमंत भिंगारदेवे, संवर्ग विकास अधिकारी राजुरा, गणेश चव्हाण, गटशिक्षणाधिकारी राजुरा, नामदेव बावणे केंद्रप्रमुख केंद्र नलफडी, धनराज रामटेके सरपंच मूर्ती, मिथुन मंदे , अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती मूर्ती, महेश शेंडे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद संजय बोबाटे, दयानंद पवार, अमोल बल्लावार आणि गावकरी यांनी आवर्जून कौतुक व अभिनंदन केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .